# मा.मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली

## दिनांक ५.०४.२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत

मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत खालील राज्य माहिती आयुक्त उपस्थित होते.

१. श्री. रत्नाकर गायकवाड, राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई
२. श्री.डी.बी. देशपांडे,राज्य माहिती आयुक्त,औरंगाबाद.
३. श्री.पी.डब्युल. पाटील, राज्य माहिती आयुक्त, नासिक
४. श्री.अे.के. जैन, राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई
५. श्रीमती टी.एफ.ठेक्केकरा, राज्य माहिती आयुक्त, कोकण्

बैठकीत खालील मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

**मुद्दा क्र. १:- दि.६.७.२०१३ रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करणे.**

दि.६.७.२०१३ रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यात आले.

**मुद्दा क्र.-२:-:प्रलंबित व्दितीय अपीले व तक्रारींचा आढावा.**

सर्व खंडपीठातील प्रलंबित व्दितीय अपीले व तक्रारीचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित अपिले व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यात जी अपिले व तक्रारी येतात त्यांच्या संख्येपेक्षा जास्त अपिले व तक्रारी निकाली काढणे आवश्यक आहे अशी चर्चा करण्यात आली.

**मुद्दा क्र.३ : विविध खंडपीठात रिक्त असलेल्या पदांचा आढावा**

सर्व खंडपीठांनी रिक्त असलेली वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी शासनाने अधिकार दिलेले असल्याने सदर रिक्त पदे संबंधित राज्य माहिती आयुक्तांनी तात्काळ भरावीत असे ठरले

**मुद्दा क्र.४ : वार्षिक अहवाल तयार करणे:-**

सन २०१३ चा वार्षिक अहवाल तयार करण्याबाबतची कार्यवाही राज्य माहिती आयोगात सुरु असून अहवालामध्ये शास्ती व विभागिय चौकशीच्या तपशिलाबरोबरच नुकान भरपाईचाही अंतर्भात करण्यात यावा असा निर्ण्य घेण्यात आला.

**मुद्दा क्र.५ :-व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुविधा सुरू करणे बाबत.**

व्हिडिओ कॅान्फरसींग सुविधा सुरु करण्यासाठी DIT कडून आवश्यकती प्राथमिक कार्यवाही झालेली असून त्यांनी BSNL ला तशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित खंडपीठांनी त्यांच्याशी संपर्क साधून पुढील कार्यवाही त्वरीत करावी असे सुचविण्यात आले.

**मुद्दा क्र.६:-अभिलेख नष्ट करणेबाबत-**

प्रत्येक खंडपीठाने कार्यलयीन धारिकांचे दिनांक १९/६/२०१३ च्या परिपत्रकानुसार निंदणीकरण करावे व अभिलेख स्कॅन करुन जतन करण्यात यावा असे चर्चेअंती ठरले.

**मुद्दा क्र.- ७- विविध बाबींसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदी**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी शासनाने आयोगासाठी मंजूर केलेल्या तरतुदीबाबत चर्चा झाली.

**मुद्दा क्र:-८ : आयत्यावेळी येणारे विषय:**

1. राज्य माहिती आयोगाने, ज्या खंडपीठाच्या कार्यक्षेत्रात अपिलार्थी वास्तव्य करीत असेल त्या संबंधीत खंडपीठाने अशा अपिलार्थीचे व्दितीय अपिले / तक्रारी हाताळाव्यात असे आदेश वेळोवेळी निर्गमित केलेले आहेत. या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली व सदरचा निर्णय योग्य नसून ज्या खंडपीठाच्या कार्यक्षेत्रात संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचे कार्यालय आहे त्याच खंडपीठाने व्दितीय अपीले / तक्रारी हाताळणे आवश्यक आहे असे ठरले. या निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.
2. पुणे खंडपीठासाठी वाहन उपलब्ध करणेबाबत तसेच आयोगाच्या विनियोजन लेखे याबाबत पाठपुरावा करण्यात यावा असे ठरले.

**वरील मुद्यांवर चर्चा झाल्यानंतर बैठक समाप्त झाली**

**(रत्नाकर गायकवाड)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**